प्रति,
प्रकल्प संचालक,
पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी,
सयानी रोड, प्रभादेवी,
मुंबई ४०० ०२५.

प्रिय महोदय/महोदया,

कृपया मला/आम्हांला रवींद्र नाटय मंदिर/मिनी थिएटरचे दि. / /२०१२ ते दि. / /२०१२ पर्यंतचे आरक्षण देण्यात यावे, ही विनंती.

मी/आम्ही पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीचे आरक्षणासंबंधी विहीत सर्व प्रशासकीय नियम तसेच अटी व शर्ती वाचलेल्या आहेत. त्या मान्य असून त्याचे पूर्ण पालन करण्यात येईल.

मी/आम्ही आरक्षणापोटी अनामत रक्कम रु. व भाडे रु. देत आहोत.

मी/आम्ही मान्य करतो की, कुठल्याही कारणास्तव आम्ही भरलेले भाडे मला/आम्हांला परत मिळणार नाही.

मी/आम्ही मान्य करतो की, खाद्यपदार्थ आणण्याबाबतचे नियम आम्हांस बंधनकारक आहेत. मी/आम्ही बाहेरुन खाद्यपदार्थ आणणार नाही.

आपले/आपली विश्वासू

वि.सू : धनाकर्ष "प्रकल्प संचालक, पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई" यांचे नावाने काढावा.

१. व्यक्तीचे/संस्थेचे नांव :

२. पत्ता व दूरध्वनी क्र. :

३. अर्जदाराचे पूर्ण नांव :

४. पत्ता व दूरध्वनी क्रमांक :

५. अर्जदाराचे संस्थेशी नाते :

६. संस्थेच्या अध्यक्षांचे नांव :

७. प्रवेश विनामूल्य/तिकीटाने :

८. कार्यक्रमाचा तपशिल,
हेतू व वैशिष्ट्ये :

वि. सू : १५ दिवस अगोदर नियोजित कार्यक्रमाचा तपशिल व्यवस्थापनास कळवावा.

---

(अर्जदाराने भरु नये.)

उपरोक्त अर्ज स्वीकारण्यात आला/स्वीकारण्यात आला नाही. :

अनामत रकमेचा (धनाकर्ष) पावती क्र. :

भाडे (धनाकर्ष) पावती क्र. :

पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकामी

(नाट्यगृह/मिनी थिएटर व इतर सुविधा यांच्या कायदासंबंधीचे नियम)

**नियंत्रण व व्यवस्थापन**

१. पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीचे दैनंदिन प्रशासन महाराष्ट्र शासनाच्या नियंत्रणाखाली आहे.

**अकादमीचे नियम बनविण्यासंबंधीचे अधिकार**

२. सर्वसामान्य व्यवस्थापन, प्रशासन, अकादमीतर्फे दिल्या जाणाऱ्या सेवा आवश्यक त्या सुस्थितीत ठेवण्याबाबतचे तसेच अकादमीमध्ये नेमणूक व कर्मचाऱ्यांची कर्तव्ये इ. संबंधीचे नियम व रेगुलेशन्स वेळोवेळी बनविण्याचे काम अकादमी करेल. अकादमीच्या इच्छेनुसार सदर नियमांमध्ये कोणत्याही वेळी बदल करण्यात येतील.

**सेवांचा वापर**

३. वेळोवेळी प्रसृत केलेल्या अटी व शर्तीस अनुसरुन अकादमीकडून लेक्चर्स, डिसकोर्सेस, परिषदा, प्रायोगिक, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व मनोरंजक कार्यक्रमासाठी अकादमीच्या सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातील.

**अकारणीचे शेडयूल**

४. सेवा पुरविण्याबद्दलचे आकारांचे शेडयूल अकादमीने सुधारित करेपर्यंत तसेच राहील. अकादमीने भाडेपट्टीचे आकार अल्प नोटीस देऊन वाढवणेबाबतचा हक्क स्वतःकडे राखून ठेवला आहे.

**हस्तांतरण**

५. तारखांच्या बदलांपोटी रु.२,०००/- एवढया रकमेची ज्यादा आकारणी होईल.

**विहित नमुन्यात अर्ज**

६. (अ) रविंद्र नाटय मंदीर/मिनी थिएटर / व इतर सुविधा यांच्या वापरासंबंधीचा अर्ज विहित नमुन्यात पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, सयानी रोड, दादर (प), मुंबई-४०० ०२५ येथील कार्यालयात सर्व तपशिलासह सादर करणे आवश्यक आहे.

(ब) ज्या दिवसाकरीता सेवा उपलब्ध करुन हव्यात त्याच्या आधी अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

| तारखा वाटप महिने | अर्ज स्विकारण्याचा कालावधी |
|---|---|
| एप्रिल ते जून | जानेवारी (पहिला पंधरवडा) |
| जुलै ते सप्टेंबर | एप्रिल (पहिला पंधरवडा) |
| ऑक्टोंबर ते डिसेंबर | जुलै (पहिला पंधरवडा) |
| जानेवारी ते मार्च | ऑक्टोंबर (पहिला पंधरवडा) |

(क) कोणत्याही संस्थेला रविंद्र नाट्य मंदिर, मिनी थिएटर, कला दालन यासाठी तारखा देता योणार नाहीत.

(ड) रविंद्र नाट्य मंदीर/ मिनी थिएटर आरक्षित करणेबाबतच्या प्रत्येक अर्जासोबत अनामत रक्कम व पूर्ण भाडे रक्कम आरक्षण कालावधीची व तेवढ्या रकमेची असे दोन स्वतंत्र धनाकर्ष असणे आवश्यक आहे.

(ई) सर्व कार्यक्रमांकरीता अनामत रक्कम व भाडे रक्कम धनाकर्षाद्वारे "प्रकल्प संचालक, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई, (Project Director, P.L.Deshpande Maharashtra Kala Academy, Mumbai) यांच्या नावे अकादमीत जमा करण्यात यावी.

(फ) ज्या संस्थेच्या नावाने रविंद्र नाट्य मंदिर, मिनी थिएटर व इतर दालने आरक्षित केले आहे.त्याच संस्थेच्या नावाने अनामत रकमेच्या परताव्याचा धनादेश दिला जाईल.

(ग) केलेल्या अर्जात कार्यक्रमाचे स्वरुप तसेच कार्यक्रमाच्या रुपरेषेची नोंद असणे आवश्यक आहे.

(ह) रविंद्र नाट्य मंदिर/मिनी थिएटर आरक्षित करताना दिलेल्या कार्यक्रमाच्या स्वरुपात बदल केल्यास त्याप्रमाणे नाट्गृहाचे/मिनी थिएटरचे भाडे वसुल केले जाईल.

(ई) दिलेल्या तारखेस कार्यक्रम सादर न केल्यास सदर सत्राचे पूर्ण भाडे वसुल केले जाईल.

(ज) एक महिन्यापूर्वी आरक्षण रद्द केल्यास भाड्यातील १०% प्रशासकीय भाराची रक्कम कपात करण्यात येईल व सेवा कर वगळून अनामत रक्कम परत करण्यात येईल किंवा कोणतीही उपलब्ध पर्यायी तारीख व सत्र देण्यात येईल. तसेच तीन दिवसांच्या आत आरक्षण रद्द केल्यास फक्त अनामत रक्कम परत करण्यात येईल. मात्र भाडे रक्कम फक्त ५०% परत करण्यात येईल.

(स) सात दिवसांच्या आत आरक्षण रद्द केल्यास फक्त अनामत रक्कम परत करण्यात येईल. मात्र भाडे रक्कम परत मिळणार नाही.

सत्राचा कालावधी

(ख) कार्यक्रमांच्या ३ सत्राच्या वेळा खालील प्रमाणे असतील.

| सत्रे | वेळ |
|---|---|
| पहिले सत्र | सकाळी ९.३० ते दुपारी १.३० |
| दुसरे सत्र | दुपारी २.३० ते संध्याकाळी ६.३० |
| तिसरे सत्र | संध्याकाळी ७.३० ते रात्री ११.३० |

तारखांचे सलग आरक्षण मिळणार नाही.

(७) कोणत्याही संस्थेला रविंद्र नाटय मंदीर, मिनी थिएटर, कला दालन यासाठी एक गठ्ठा तारखा देता येणार नाहीत.

(८) अ) रविंद्र नाटय मंदीर/मिनी थिएटर आरक्षित करणेबाबतच्या प्रत्येक अर्जासोबत अनामत रक्कम व पूर्ण भाडे रक्कम असणे अभिप्रेत आहे. तसेच प्रत्येक अर्ज संबधित संस्थेच्या लेटरहेडवर असणे आवश्यक आहे.

(ब) सर्व कार्यक्रमांकरीता अनामत रक्कम व भाडे रक्कम धनाकर्षाद्वारे " प्रकल्प संचालक, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई,( Project Director , P.L.Deshpande Maharashtra Kala Academy, Mumbai) " यांच्या नावे अकादमीत जमा करण्यात यावी.

आरक्षणाच्या रकमेचा परतावा व जप्ती

(क) ज्या संस्थेच्या नावाने रविंद्र नाट्य मंदिर, मिनी थिएटर व इतर दालने आरक्षित केले आहे. त्याच संस्थेच्या नावाने अनामत रकमेच्या परताव्याचा धनादेश दिला जाईल.

(ड) केलेल्या अर्जात कार्यक्रमाचे स्वरुप तसेच कार्यक्रमाच्या रुपरेषेची नोंद असणे आवश्यक आहे.

(इ) रविंद्र नाटय मंदिर/मिनी थिएटर आरक्षित करताना दिलेल्या कार्यक्रमाच्या स्वरुपात बदल केल्यास त्याप्रमाणे नाटयगृहाचे /मिनी थिएटरचे भाडे वसुल केले जाईल.

(क) दिलेल्या तारखेस कार्यक्रम सादर न केल्यास सदर सत्राचे पूर्ण भाडे वसुल केले जाईल.

(ख) एक महिन्यापूर्वी आरक्षण रद्द केल्यास भाडयातील १०% प्रशासकीय भाराची रक्कम कपात करण्यात येईल व सेवा कर वगळून अनामत रक्कम परत करण्यात येईल किंवा कोणतीही उपलब्ध पर्यायी तारीख व सत्र देण्यात येईल. तसेच तीस दिवसांच्या आत आरक्षण रद्द केल्यास अनामत रक्कम परत करण्यात येईल. मात्र भाडे रक्कम फक्त ५०% परत करण्यात येईल.

(ग) सात दिवसांच्या आत आरक्षण रद्द केल्यास फक्त अनामत रक्कम परत करण्यात येईल. मात्र भाडे रक्कम परत मिळणार नाही.

| | |
|---|---|
| अर्ज स्विकारण्याचे /नाकारण्याचे अधिकार | ९ . अकादमी किंवा ज्यास अकादमीने अधिकार प्रदान केलेले असतील त्या अधिकाऱ्यास आरक्षणासाठी केलेला अर्ज स्वीकारण्याचे/नाकारण्याचे अधिकार राहतील. अर्ज नाकारल्यास त्याची कारणमीमांसा अकादमीने संबंधित अर्जदारास देण्याची गरज नाही. |
| अनामत रक्कम | १०) १) अनामत रक्कम कार्यक्रम झाल्यानंतर तीन वर्षांचे आत परत घेतली नाही तर ती कोणत्याही पूर्वसुचना न देता जप्त करण्यात येईल. |
| अकादमीचे अंतिम निर्णयानुसार नुकसान भरपाई | २) कार्यक्रमाच्या वेळात अकादमीच्या इमारतीचे, फर्निचर, फिटींग्स, वायरिंग व इतर साहित्य इत्यादींचे नुकसान झाल्यास तर अनामत रकमेतुन नुकसान भरपाई वसुल करुन उरलेली रक्कम अर्जदारास परत करण्यात येईल. सदर बाबतचा अंतिम निर्णय अकादमीचा असून तो संबंधित संस्थेला बंधनकारक असेल. |
| जास्त प्रमाणात झालेल्या नुकसानाची वसुली | ३) जर इमारतीचे नुकसान अनामत रकमेपेक्षा जास्त असेल तर अर्जदारास अनामत रक्कम वजा जाता उर्वरित नुकसान रकमेची रक्कम अदा करावी लागेल. |
| अर्ज नाकारल्याबाबत नुकसान भरपाई | ११. अकादमीस अर्जदाराचा अर्ज कोणतेही कारण न देता कोणत्याही क्षणी रद्द करावयाचा पूर्ण अधिकार आहे. अर्ज नाकारल्यासंदर्भात अर्जदार नुकसान भरपाईचा दावा करु शकणार नाही. अर्जदारास त्याची रक्कम बिनव्याजी परत करण्यात येईल. |

| |
|---|
| अयोग्य कार्यक्रम रद्द करण्याचा अधिकार |

१२. रविंद्र नाटय मंदीर किंवा मिनी थिएटर वापरण्यास परवानगी दिल्यावर जर अकादमीच्या निदर्शनास आले की,

१.ज्या कार्यक्रमासाठी परवानगी दिली आहे तो कार्यक्रम योग्य नसेल किंवा सदर कार्यक्रम हरकत घेण्यास पात्र असेल किंवा एखाद्या नियमाचे उल्लंघन करणारा असेल,

२.कार्यक्रमाचे स्वरुप व उद्देश यांविषयी अर्जदारास दिशाभूल केली असेल,

तर अकादमीस कोणतीही कारण न देता सदर कार्यक्रम रद्द करण्याचा अधिकार राहील. अशा परिस्थितीत अर्जदाराचे भाडे व अनामत रक्कम परत करण्यास येईल. परंतु अर्जदारास सदरबाबत अकादमीस जाब विचारता येणार नाही. तसेच कार्यक्रम रद्द केल्याबद्दल नुकसान भरपाईचा दावाही करता येणार नाही.

| |
|---|
| कॉपीराईटचे उल्लंघन |

१३. जो कार्यक्रम व्यक्तिच्या किंवा संस्थेच्या कॉपीराईटचे उल्लघंन करणारा असेल तो कार्यक्रम रविंद्र नाटय मंदीर/ मिनी थिएटर येथे होऊ दिला जाणार नाही. असे कॉपीराईटचे उल्लंघन झाल्याचे समजण्यापूर्वी जर कार्यक्रम रविंद्र नाटय मंदीर/मिनी थिएटर येथे झाला तर कायद्याच्या दृष्टीने पुढील परिणामांसाठी सदर उल्लंघन करणारी व्यक्ती/संस्था सर्वस्वी जबाबदार राहील. त्याच्यासाठी अकादमी/ तिचे व्यवस्थापन जबाबदार असणार नाही.

| |
|---|
| आरक्षण व जमेची वैधता |

१४. आरक्षण व आरक्षणाच्या भाडयाच्या/अनामत रकमेच्या पावत्यांवर व्यवस्थापक किंवा अकादमीच्या लेखा विभाग किंवा सदर कामासाठी अधिकृतरित्या नेमणूक केलेल्या व्यक्तिच्या सहया झाल्यावरच त्यास वैधता प्राप्त होईल.

| |
|---|
| अतिरोक्त वापराचे शुल्क |

१५. जर अर्जदाराने कार्यक्रम संपल्यानंतर विहीत वेळात रविंद्र नाटय मंदीर/मिनी थिएटर सुपूर्द केले नाही तर सदर नाटयगृहाचा /मिनी थिएटरचा अनाधिकृत वापर केल्याबाबत त्यास अकादमीतर्फे दंड आकारण्यात येईल.

| |
|---|
| वेळेत अतिरिक्त वापराचे शुल्क न भरल्यास |

१६. कार्यक्रम झाल्यानंतर १५ दिवसांत अतिरिक्त शुल्क, अतिरिक्त वीज शुल्क यांचा भरणा न केल्यास त्यावर रकमेच्या २५% दंड आकारुन ती रक्कम अनामत रक्कमेतून कमी करण्यात येईल.

| |
|---|
| मर्यादित जागेचा वापर |

१७. अर्जदारास आरक्षित केलेल्या नाटयगृहाचा/मिनी थिएटरचा, रंगमंचाचा, प्रेक्षागृहाचा तसेच संबंधित मजल्यावरील सभोवतालच्या जागेव्यतिरिक्त इतर मजल्यावरील जागेचा वापर करता येणार नाही.

| |
|---|
| आरक्षणाचे अहस्तांतरण |

१८. एखाद्या संस्थेने आरक्षित केलेले सत्र किंवा आरक्षित नाटयगृहाचा काही भाग त्या संस्थेस परस्पर दुसऱ्या संस्थेस/व्यक्तिस देता येणार नाही. असे केल्यास अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

| |
|---|
| बाहेरील सामान अकादमीत आणणेबाबत |

१९. अकादमीच्या इच्छेनुसार व विहित केलेल्या अटी व शर्तीस अनुसरुन संस्थेस बाहेरुन फर्निचर, इतर सामान, ध्वनी व प्रकाश सामुग्री आणण्यास हरकत नाही.

| | |
|---|---|
| रविंद्र नाटय मंदीर मधील आसनव्यवस्था | २०. (१) ९११ आसन क्षमतेपेक्षा जास्त प्रेक्षक प्रेक्षागृहात घेतले जाणार नाही.<br>(२) प्रेक्षागृहातील १६ आसने अकादमीकरिता आरक्षित आहेत. A रांग- ७,८,९,१० D रांग - ८,९,१०,११,१२,१३,१४,१५,१६,१७,१८,१९ B रांग- १९,२० (सेन्सॉर बोर्ड) |
| मिनी थिएटर मधील आसनव्यवस्था | २१. (१) १९९ आसन क्षमतेपेक्षा जास्त प्रेक्षक प्रेक्षागृहात घेतले जाणार नाही.<br>(२) प्रेक्षागृहातील ४ आसने अकादमीकरिता आरक्षित आहेत. A रांग- ७,८,९,१०. |
| धुम्रपान व इतर वाईट गोष्टींस सक्त मनाई | २२. नाटयगृह/ मिनी थिएटरमध्ये थुंकण्यास, धुम्रपानास तसेच कुठल्याही प्रकारचा वादंग निर्माण करण्यास, किंवा नाटयगृहाचा/मिनी थिएटरचा कोणताही भाग खराब करण्यास सक्त मनाई आहे. तसे घडल्यास अर्जदार सर्वस्वी जबाबदार असेल. |
| नाट्यगृह व मिनी थिएटरच्या स्वच्छते विषयी | २३. अर्जदाराने आरक्षित केलेल्या नाट्यगृहाचा/मिनी थिएटरचा कोणताही भाग खराब करण्यास सक्त मनाई आहे. तसेच सदर बिल्डिंगमधील कोणत्याही प्रकारचे फर्निचर तसचे इतर कोणत्याही प्रकारच्या वस्तू त्यांचे मूळ जागेवरून हलविण्यात येऊ नये. |
| सेवेत खंड पडल्यास अकादमी जबाबदार नाही | २४. नाट्यगृह/मिनी थिएटरमध्ये स्टेज, साऊंड, प्रकाश व वातानुकूलित यंत्रणा सेवेसाठी सुसज्ज आहे. कार्यक्रमाच्या वेळी या सेवा उपलब्ध करुन देणेत येतील. सदर सेवा नैसर्गिक कारणामुळे बंद झाल्यास त्याची जबाबदारी अकादमीवर राहणार नाही |
| नाटयगृहात/मिनी थिएटरमध्ये खाद्यपदार्थ निषीध्द | २५. कुठल्याही संस्थेच्या कार्यक्रमाच्या वेळी प्रेक्षागृहात, रंगमंचावर, मेक-अप रुममध्ये कोणतेही खाद्यपदार्थ, थंड व गरम पेये नेण्यास सक्त मनाई आहे. तसेच या अकादमीच्या आवारात बाहेरुन खाद्यपदार्थ आणण्यासही सक्त मनाई आहे. |
| पोस्टर्स व बॅनर्स संबंधी | २६. कार्यक्रमाच्या १ आठवडयाआधी अर्जदारास कार्यक्रमाचे ६" x ३" चे १ पोस्टर /बॅनर संकुलात लावण्यास परवानगी आहे. विक्री वाढण्यासाठी संयोजकांचे बॅनर्स तसेच काउंटर्स लावण्यास मनाई आहे. |
| अर्जदाराची विधिविषयक व करविषयक कर्तव्ये | २७. अर्जदाराने पोलीस महानगरपालिकेचे नियम पाळावेत. तसेच आरक्षित नाटयगृह/मिनी थिएटरचा वापर विहीत वेळेपुरताच मर्यादित ठेवावा. अर्जदाराने रंगभूमि करासहीत इतर लागू असलेले कर भरणे आवश्यक आहे. |
| अकादमीकडे जमा करण्याच्या परवान्यांविषयी | २८.कोणत्याही कार्यक्रमाची तिकिट विक्री करण्यापूर्वी किंवा कार्यक्रमापूर्वी कार्यक्रमाच्या स्वरुपानुसार कार्यक्रमापूर्वी खालीलप्रमाणे परवाने अकादमीकडे जमा करावेत.<br>अ) तिकिट विक्री व देणगी प्रवेशिका करिता परवाना (बृहन्मुंबई पोलीस आयुक्त, शस्त्र परवाना |

विभाग, थिएटर विभाग, क्रॉफर्ड मार्केट समोर, मुंबई- ४०००१)

ब) कार्यक्रमाचे सादरीकरण व ध्वनीक्षेपकाचे वापर याकरिता परवाना (सहाय्यक पोलीस आयुक्त, दादर (प), मुंबई- ४०० ०२८)

क) फॅशन शो व अन्य कार्यक्रमांना, ज्यांना प्रचलित शासन निर्णयानुसार करमणूक अधिभार लागतो. (सचिव, परिनिरिक्षण मंडळ, बॅरेक्स, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई- २०) यांच्याकडील तसेच (जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचा करमणूक विभाग)

ड) मराठी, गुजराती नाटयप्रयोगाव्यतिरिक्त इतर कार्यक्रमांच्या बाबतीत रंगभूमीकर (थिएटर टॅक्स) भरल्याची पावती. (उप करनिर्धारक आणि संकलन (पश्चिम उपनगरे) यांचे कार्यालय, बृहनमुंबई महानगरपालिका, २ रा मजला, महापालिका कार्यालय इमारत, वांद्रे (पश्चिम), मुंबई - ४०० ०५०.)

इ) परदेशी कलासंस्थेकरिता परवाना गृहमंत्रालयातून प्राप्त करणे गरजेचे आहे.

ई) नाटयप्रयोग व विविध कार्यक्रमांकरिता महाराष्ट्र शासनाच्या रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळाचे प्रमाणपत्र (सचिव, रंगभूमी प्रयोग परिनिरिक्षण मंडळ, महाराष्ट्र शासन बॅरॅक नं. १८ सचिवालय जिमखान्यामागे बॅकबे रेक्लमेशन, मुंबई- ४०० ०२१)

**लाऊडस्पीकर्स संबंधी**

२९. कोणत्याही प्रकारचे संगीत व लाऊडस्पीकर्स नाटयगृहाच्या/मिनी थिएटरच्या प्रवेशाच्या बाहेरील बाजुस लावू नये.

३०. अर्जदाराने त्यांच्या कलावंताना तसेच त्यांच्या इतर कर्मचाऱ्यांना बॅचेस द्यावेत. सदर बॅचेस लावलेल्या व्यक्तिंनाच रंगमंचावर प्रवेश देण्यात येईल.

**नाट्यगृहात प्रवेश करण्याचा अधिकार**

३१. अकादमीच्या व्यवस्थापकीय अधिकाऱ्यांना तसेच कर्मचाऱ्यांना कोणत्याही वेळी नाटयगृहात /मिनी थिएटरमध्ये प्रवेश करण्याचा अधिकार आहे.

३२.कोणत्याही कार्यक्रमाची तिकिट विक्री करण्यापूर्वी किंवा कार्यक्रमापूर्वी कार्यक्रमाच्या स्वरुपानुसार कार्यक्रमापूर्वी खालीलप्रमाणे परवाने अकादमीकडे जमा करावेत.

अ) तिकिट विक्री व देणगी प्रवेशिका करिता परवाना (बृहन्मुंबई पोलीस आयुक्त, शस्त्र परवाना विभाग, थिएटर विभाग, क्रॉफर्ड मार्केट समोर, मुंबई- ४०००१)

ब) कार्यक्रमाचे सादरीकरण व ध्वनीक्षेपकाचे वापर याकरिता परवाना (सहाय्यक पोलीस आयुक्त, दादर (प), मुंबई- ४०० ०२८)

क) फॅशन शो व अन्य कार्यक्रमांना, ज्यांना प्रचलित शासन निर्णयानुसार करमणूक अधिभार लागतो. (सचिव, परिनिरिक्षण मंडळ, बॅरेक्स, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई- २०) यांच्याकडील तसेच (जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचा करमणूक विभाग)

ड) मराठी, गुजराती नाटयप्रयोगाव्यतिरिक्त इतर कार्यक्रमांच्या बाबतीत रंगभूमीकर (थिएटर टॅक्स) भरल्याची पावती. (उप करनिर्धारक आणि संकलन (पश्चिम उपनगरे) यांचे कार्यालय, बृहनमुंबई महानगरपालिका, २ रा मजला, महापालिका कार्यालय इमारत, वांद्रे (पश्चिम), मुंबई - ४०० ०५०.)

इ) परदेशी कलासंस्थेकरिता परवाना गृहमंत्रालयातून प्राप्त करणे गरजेचे आहे.

ई) नाटयप्रयोग व विविध कार्यक्रमांकरिता महाराष्ट्र शासनाच्या रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळाचे प्रमाणपत्र (सचिव, रंगभूमी प्रयोग परिनिरिक्षण मंडळ, महाराष्ट्र शासन बॅरॅक नं. १८ सचिवालय जिमखान्यामागे बॅकबे रेक्लमेशन, मुंबई- ४०० ०२१)

द्वारपालांच्या सेवा

३३. द्वारपालांच्या सेवा रविंद्र नाटय मंदीर/मिनी थिएटरमध्ये उपलब्ध करुन दिल्या जातील. संबंधित अर्जदारास विहीत दर तक्त्यानुसार त्यांना सेवाशुल्क द्यावे लागेल.

३४. नैसर्गिक आपत्ती किंवा अनपेक्षित तांत्रिकी कारणामुळे नाटयगृहात कार्यक्रम सादर करताना अडचण निर्माण झाल्यास सदर संस्थेला दुसरी पर्यायी तारीख उपलब्ध करुन देण्यात येईल. संबंधित संस्थेला दुसरी तारीख नको असल्यास केवळ अनामत रक्कम परत करण्यात येईल

.

३५. कोणत्याही शासकीय विभागांना किंवा खाजगी संस्थाना नाटयगृह शासन मान्यतेशिवाय विनाशुल्क देण्यात येणार नाही.

३६. संस्थाचे कार्यक्रम संपलयावर रंगमंचावर स्वच्छता करण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची राहील.

| | |
|---|---|
| १४ | कुठल्याही संस्थेच्या कार्यक्रमाचे वेळी प्रेक्षागृहात रंगमंचावर, मेक-अप रुपमध्ये कोणतेही खाद्यपदार्थ, थंड व गरम पेये नेण्यास सक्त मनाई आहे. |
| १५ | ९११ आसन क्षमतेपेक्षा जास्त प्रेक्षक प्रेक्षागृहात घेतले जाणार नाही. |
| १६ | रविंद्र नाटय मंदिर व मिनी थिएटर व इतर दालने येथे कोणताही ज्वालाग्राही पदार्थ वापरण्यास सक्त मनाई आहे. |
| १७ | संस्थाचे कार्यक्रम संपलयावर रंगमंचावर स्वच्छता करण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची राहील. |
| १८ | प्रयोग संपल्यावर स्टेज ऑपरेटर, स्टेज वर्कर, द्वारपाल व सुरक्षा रक्षक यांनी रंगमंच, मेकअप व नाटयगृहाची तपासणी करताना निर्माता व त्या संस्थाचे प्रतिनिधी यांना हजर राहून तपासणी अहवालावर स्वाक्षरी करावी लागेल. स्वाक्षरी करण्यास नकार दिल्यास व्यवस्थापनाने तयार केलेला अहवाल त्यांना मान्य असल्याचे समजण्यात येईल व त्यानुसार भरपाई द्यावी लागेल. |
| १९ | रविंद्रनाटय मंदिर, मिनी थिएटर व इतर दालनात कोणत्याही वस्तुचे नुकसान झाल्यास सर्व जबाबदारी आरक्षित केलेल्या संस्थेची असेल. |
| २० | प्रेक्षागृहातील १६ आसने अकादमीकरिता आरक्षित आहेत. A रांग- ७,८,९,१०<br>D रांग - ८,९,१०,११,१२,१३,१४,१५,१६,१७,१८,१९ B रांग- १९,२० (सेन्सॉर बोर्ड) |
| २१ | कोणत्याही संस्थेला रविंद्रनाटय मंदिर, मिनी थिएटर, आर्ट गॅलरी एक गठ्ठा तारखा देण्यात येणार नाहीत. |
| २२ | कोणत्याही शासकीय विभागांना किंवा खाजगी संस्थाना नाटयगृह शासन मान्यतेशिवाय विनाशुल्क देण्यात येणार नाही. |
| २३ | एखाद्या संस्थेस दिलेली तारीख किंवा आरक्षित केलेले सत्र त्या संस्थेस परस्पर दुसऱ्या संस्थेस देता येणार नाही. असे केल्यास अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. |

| | |
|---|---|
| २५ | अर्ज सादर करताना भरलेली अनामत रक्कम बिनव्याजी असेल. केवळ अनामत रककम ठेवली म्हणून तारखा देण्याचे बंधन प्रशासनावर राहणार नाही. इतर कार्यक्रमांकरिता दरपत्रकात नमूद केल्याप्रमाणे अनामत रक्कम भरावी लागेल. |
| २६ | सर्व कार्यक्रमांकरिता भाडेरक्कम तसेच अनामत रक्कम धनाकर्षाद्वारे (D.D) Project Director, P. L. Deshpande Maharashtra Kala Academy, Mumbai, (प्रकल्प संचालक, पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई) यांच्या नावे जमा करण्यात यावी. |
| २७ | उपलब्ध तारखांचे तात्पुरते आरक्षण केवळ तीन दिवसांकरिता ठेवण्यात येईल. तीन दिवसात भाडे व अनामत रक्कम संस्थेने न भरल्यास त्यांचे तात्पुरते आरक्षण रद्द करण्यात येईल. ती तारीख व सत्र अनामत रक्कम आणि भाडे रकमेचा प्राथम्याने भरणा करण्याऱ्या संस्थेस देण्यात येईल. |
| २८ | कार्यक्रम झाल्यानंतर १५ दिवसांत अतिरिक्त शुल्क, अतिरिक्त वीज शुल्क यांचा भरणा न केल्यास त्यावर रकमेच्या २५% दंड आकारुन ती रक्कम अनामत रक्कमेतून कमी करण्यात येईल. |
| २९ | नैसर्गिक आपत्ती किंवा अनपेक्षित तांत्रिकी कारणामुळे नाटयगृहात कार्यक्रम सादर करताना अडचण निर्माण झ ाल्यास सदर संस्थेला दुसरी पर्यायी तारीख उपलब्ध करुन देण्यात येईल. संबंधित संस्थेला दुसरी तारीख नको असल्यास केवळ अनामत रक्कम परत करण्यात येईल. |
| ३१ | कोणत्याही कार्यक्रमाची तिकिट विक्री करण्यापूर्वी किंवा कार्यक्रमापूर्वी कार्यक्रमाच्या स्वरुपानुसार कार्यक्रमापूर्वी खालीलप्रमाणे परवाने अकादमीकडे जमा करावेत.<br>अ) तिकिट विक्री व देणगी प्रवेशिका करिता परवाना (बृहन्मुंबई पोलीस आयुक्त, शस्त्र परवाना विभाग, थिएटर विभाग, क्रॉफर्ड मार्केट समोर, मुंबई- ४०००१)<br>ब) कार्यक्रमाचे सादरीकरण व ध्वनीक्षेपकाचे वापर याकरिता परवाना (सहाय्यक पोलीस आयुक्त, दादर (प), मुंबई- ४०० ०२८)<br>क) फॅशन शो व अन्य कार्यक्रमांना, ज्यांना प्रचलित शासन निर्णयानुसार करमणूक अधिभार लागतो. (सचिव, परिनिरिक्षण मंडळ, बॅरेक्स, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई- २०) यांच्याकडील तसेच (जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचा करमणूक विभाग)<br>ड) मराठी, गुजराती नाटयप्रयोगाव्यतिरिक्त इतर कार्यक्रमांच्या बाबतीत रंगभूमीकर (थिएटर टॅक्स) भरल्याची पावती. (उप करनिर्धारक आणि संकलन (पश्चिम उपनगरे) यांचे कार्यालय, बृहनमुंबई महानगरपालिका, २ रा मजला, महापालिका कार्यालय इमारत, वांद्रे (पश्चिम), मुंबई ३ ४०० ०५०.)<br>इ) परदेशी कलासंस्थेकरिता परवाना गृहमंत्रालयातून प्राप्त करणे गरजेचे आहे.<br>ई) नाटयप्रयोग व विविध कार्यक्रमांकरिता महाराष्ट्र शासनाच्या रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळाचे प्रमाणपत्र (सचिव, रंगभूमी प्रयोग परिनिरिक्षण मंडळ, महाराष्ट्र शासन बॅरॅक नं. १८ सचिवालय जिमखान्यामागे बॅकबे रेक्लमेशन, मुंबई- ४०० ०२१) |

उपरोक्त सर्व आवश्यक ते कागदपत्रे जमा न केल्यास कार्यक्रम सादर करता येणार नाही व त्याची भाडे रक्कम परत मिळणार नाही.